# माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांमध्ये स्व जाणीवेच्या जडणघडणीतील समस्यांचा अभ्यास

**प्रा. डॉ. सिद्धार्थ सुधाकरराव होवाळ,**
सहयोगी प्राध्यापक
महात्मा फुले एम. एड. महाविद्यालय,
जळकोट, जि. लातूर

**गोषवारा :**

*प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये काही अंगभूत गुण असतात, अशा गुणवैशिष्ट्यांचा विचार करून शिक्षण घ्यायला पाहिजे. विद्यार्थ्यामध्ये अनेक गुणवैशिष्ट्ये असतात ती शोधणे कठीण वाटत असले तरी आवश्यक आहेत. व्यक्तिमत्त्वाचा इतरांवर प्रभाव पाडण्यासाठी व्यक्तीमधील गुणवैशिष्ट्यांचा विकास करणे गरजेचे आहे. विद्यार्थ्याने स्वतःला ओळखण्यासाठी शिक्षकांनी निरीक्षणशक्ती, संभाषण चातुर्य, जीवनशैली अशा घटकांचा विचार करणे महत्वाचे ठरते. प्रस्तुत संशोधनात विद्यार्थी स्व ची जाणीव याबाबत किती विचार करतात हे जाणून घेण्यासाठी सर्वेक्षण पद्धतीचा अवलंब केलेला आहे. यासाठी 30 प्रश्नांची मिश्र प्रश्नावली वापरून शेकडेवारीच्या सहाय्याने प्राप्त माहितीचे अर्थनिर्वचन केले आहे. बऱ्याच विद्यार्थ्यांना स्व बाबत माहिती सांगता येत नाही. अनेक विद्यार्थ्यांना स्वतःचा विकास व्हावा असे वाटते. स्वतःचा विकास कसा करायचा याबाबत विद्यार्थी अनभिज्ञ आहेत. हे सदरील संशोधनाचे निष्कर्ष आहेत.*

**प्रस्तावना :**

आधुनिक काळात विविध क्षेत्रात प्रगती होत असताना शिक्षणामध्ये ही खूप मोठे बदल झालेले आहेत. पूर्वी केवळ ज्ञानात्मक विकास व्हावा यासाठी धडपडणारे शिक्षक व पालक आज विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी प्रयत्न करीत आहेत. त्यासाठी वाट्टेल ती किंमत मोजायला तयार आहेत. आजचे युग हे स्पर्धेचे युग आहे. यामध्ये आपला विद्यार्थी टिकला पाहिजे, त्याचे भवितव्य घडले पाहिजे, यासाठी ते खूप काळजी घेत आहेत. विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक अपेक्षा, अभिरुची व त्यांचे अंतर्गत गुण याकडे दुर्लक्ष होत आहे. फक्त काळाला काय गरज आहे, याचाच विचार करून प्रत्येक पालक आपल्या पाल्याला निश्चित अशा साच्यात घालून आकार देण्याचा प्रयत्न करीत आहे. त्यामुळे मुलांचे भवितव्य घडण्याऐवजी त्यांच्या मनावर दडपण येऊन त्यांना अधिकच ताण तणाव निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे हे विद्यार्थी भविष्यात यशस्वी होतील की नाही याची शंकाच वाटते. म्हणूनच विद्यार्थ्यांकडे नवीन दृष्टिकोनातून बघणे गरजेचे ठरते. मुळातच प्रत्येक विद्यार्थी निसर्गाची एक वेगळी रचना आहे. याचा विचार शिक्षणातून करून त्यांच्या क्षमतांचा विचार करून त्यांना शिक्षणाच्या माध्यमातून स्वतःची ओळख करून दिली तर निश्चितच ते भविष्यात यशस्वी होतील. देशासाठी काहीतरी करून दाखवतील. प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये काही अंगभूत गुण असतात, अशा गुणवैशिष्ट्यांचा विचार करून शिक्षण घ्यायला पाहिजे. विद्यार्थ्यामध्ये अनेक गुणवैशिष्ट्ये असतात ती शोधणे कठीण वाटत असले तरी आवश्यक आहेत. व्यक्तिमत्त्वाचा इतरांवर प्रभाव पाडण्यासाठी व्यक्तीमधील गुणवैशिष्ट्यांचा विकास करणे गरजेचे आहे. विद्यार्थ्याने स्वतःला ओळखण्यासाठी शिक्षकांनी निरीक्षणशक्ती, संभाषण चातुर्य, जीवनशैली अशा घटकांचा विचार करणे महत्वाचे ठरते. पण या शिक्षणामध्ये विद्यार्थ्यांना मी कोण आहे ? व माझ्यात कोणते गुण आहेत ? याचीच ओळख होत नाही. यासाठी त्याला अनेक घटक कारणीभूत आहेत. विद्यार्थ्यांना स्व ची ओळख होण्यासाठी जे अनेक घटक कारणीभूत ठरतात. त्यांचा शोध घेणे गरजेचे आहे यासाठी संशोधकाने सदर विषय निवडला आहे.

**संशोधनाची गरज व महत्त्व :**

विद्यार्थ्यांना आपल्या स्वतःमध्ये कोणते गुण आहेत व कोणत्या क्षमता आहेत हे जर ओळखले किंवा त्यांना जर आपण या क्षमतांची ओळख करून दिली. तर ते स्वतःमधील वेगळेपण लक्षात घेऊन त्यानुसार ते प्रगती करतील. शिवाय आपण काय करू शकतो हे एकदा समजले की त्यांचा आत्मविश्वास वाढेल. व त्यानुसार ते पुढील वाटचाल करतील. त्यामुळे त्यांनी जे क्षेत्र निवडले आहेत, त्यात भविष्यात निश्चितच प्रगती करतील. म्हणून सदरील संशोधन महत्त्वाचे आहेत.

**उद्दिष्टे :**

1. विद्यार्थ्यांमध्ये स्व च्या जाणीवेतील अडथळ्यांचा शोध घेणे.
2. विद्यार्थ्यांमध्ये स्व च्या जाणीवेतील अडथळ्यांवर उपाय सुचविणे

**व्याप्ती व मर्यादा :**

1. सदरील संशोधनातून निघणारे निष्कर्ष माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांना लागू होतील
2. प्रस्तुत संशोधन हे माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या स्व जाणीवेचा अभ्यास करण्याइतके व्यापक आहे.
3. प्रस्तुत संशोधन 2020 ते 2022 या कालावधीपुरतेच मर्यादित आहे.
4. प्रस्तुत संशोधन हे माध्यमिक विद्यार्थ्यांपुरतेच मर्यादित आहे
5. सदरील संशोधन निघणारे निष्कर्ष फक्त लातूर जिल्ह्यापुरतेच मर्यादित आहे.
6. प्रस्तुत संशोधनाचे निष्कर्ष हे प्रतीसादकानी दिलेल्या प्रतिसादावर अवलंबून असतील.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत संशोधनात विद्यार्थ्यांच्या स्व जाणीवेचा सद्यस्थितीचा अभ्यास अपेक्षित असल्यामुळे शालेय सर्वेक्षण पद्धतीचा वापर केला आहे.

**जनसंख्या** : सदरील संशोधन करण्यासाठी लातूर जिल्ह्यातील माध्यमिक शिक्षण घेणारे सर्व विद्यार्थी जनसंख्या म्हणून विचारात घेतलेले आहेत.

**न्यादर्श** : प्रस्तुत संशोधनासाठी न्यादर्श निवडण्यासाठी सुगम यादृच्छिक नमुना निवड पद्धतीतील लॉटरी पद्धतीचा वापर केलेला आहे. अहमदपूर तालुक्यातील 20 शाळेतून 200 विद्यार्थ्यांची निवड केली आहे.

**माहिती संकलनाचे साधन** : सदर संशोधनासाठी माहिती संकलित करण्यासाठी प्रश्नावली या साधनाचा वापर केला आहे त्यात 30 मुक्त व बंदिस्त प्रश्नांचा समावेश आहे. प्रश्नांची काठीण्यपातळी व भेदाभेदन क्षमता तपासून प्रश्न निश्चित केले आहेत. सदरील प्रश्नावलीची विश्वसनियता व साप्रमानता तपासली आहे. संकलित केलेल्या प्रश्नावलीचे शेकडेवारीच्या सहाय्याने संख्याशास्त्रीय विश्लेषण केले आहे.

**तक्ता क्र.** 1

| **प्रश्न क्र.** | **प्रश्न विवरण** | **प्रतिसाद** | **शेकडा** | **प्रमाण** | |
|---|---|---|---|---|---|
| | | **पर्याय** 1 | **पर्याय** 2 | **पर्याय** 3 | **पर्याय** 4 |
| 5 | स्वतः मधील क्षमता याबाबत प्रतिसाद | 10 | 07 | 15 | 68 |
| 9 | स्वतः मधील क्षमतांच्या विकासाबाबत प्रतिसाद | 50 | 08 | 24 | 18 |
| 16 | शाळेतील उपक्रमाबाबत प्रतिसाद | 62 | 22 | 11 | 05 |
| 19 | शाळेतील उपक्रमातील सहभागावर शिक्षकांशी चर्चाबाबत प्रतिसाद | 83 | 06 | 07 | 04 |
| 23 | पालकांच्या शिक्षणातील अपेक्षा विषयक प्रतिसाद | 13 | 74 | 08 | 05 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 25 | अनोळखी व्यक्तीसोबत संवादाबाबत प्रतिसाद | 14 | 07 | 27 | 52 |

**विश्लेषण : -**

1. 68 % विद्यार्थी स्वतः मधील क्षमता स्पष्ट करू शकत नाहीत.
2. 62 % विद्यार्थी शाळेतील उपक्रमात सहभागी होणे टाळतात.
3. 83 % विद्यार्थ्यांच्या मते उपक्रमातील सहभागावर शिक्षकांकडून प्रत्याभरण मिळत नाही.
4. 74 % पालकांच्या शिक्षणाबाबतच्या अपेक्षा समाजाचा संदर्भात आहेत.
5. 52 % विद्यार्थी अनोळखी व्यक्तीसोबत संवाद साधताना गोंधळून जातात.

**अर्थनिर्वचन:-**

1. प्राप्त माहितीच्या आधारे निम्म्याहून अधिक विद्यार्थी स्वतः मधील क्षमता स्पष्ट ओळखू शकत नाहीत.
2. विद्यार्थी शाळेतील उपक्रमात सहभागी होणे टाळतात.
3. बहुसंख्य विद्यार्थ्यांना उपक्रमातील सहभागावर शिक्षकांकडून प्रत्याभरण मिळत नाही,ही गंभीर बाब आहे.
4. पालकांच्या शिक्षणाबाबतच्या अपेक्षा समाजाचा संदर्भात आहेत.
5. निम्मे विद्यार्थी अनोळखी व्यक्तीसोबत संवाद साधताना गोंधळून जातात.

**निष्कर्ष :-**

1. बऱ्याच विद्यार्थ्यांना स्व बाबत माहिती सांगता येत नाही.
2. अनेक विद्यार्थ्यांना स्वतःचा विकास व्हावा असे वाटते.
3. स्वतःचा विकास कसा करायचा याबाबत विद्यार्थी अनभिज्ञ आहेत.
4. विद्यार्थ्यांचा स्वतःचा विकास होण्यासाठी हवे तसे वातावरण उपलब्ध होत नाही.
5. पालक विद्यार्थ्यांच्या स्व चा विचार न करता सामाजिक अपेक्षांचा विचार करून मुलांना घडविण्याचा प्रयत्न करतात.
6. विद्यार्थ्यांना स्व ची जाणीव व्हावी म्हणून शाळेमध्ये उपक्रम राबविले जात नाहीत.
7. विद्यार्थ्यांच्या जाणीव विकासास कौटुंबिक परिस्थितीचा प्रभाव पडतो.
8. विकासासाठी आवश्यक असणारी साधने मुलांना मिळत नाहीत.
9. विद्यार्थ्यांच्या स्वतःच्या जडणघडणीवर शेजारी व मित्र यांचा प्रभाव पडतो.
10. शाळेमध्ये राबविले जाणाऱ्या उपक्रमात सर्व विद्यार्थ्यांचा सहभाग नसतो.
11. उपक्रमात सहभाग घेतलेल्या विद्यार्थ्यांना प्रत्याभरण मिळत नाही.

**शिफारशी :**

1. विद्यार्थ्यांचा स्व जाणीवेचा विकास होण्यासंदर्भात उपक्रमात राबविले जावेत.
2. शाळेमध्ये राबविले जाणाऱ्या उपक्रमात विद्यार्थ्यांचा सहभाग वाढविण्याचा प्रयत्न व्हावा.
3. विद्यार्थ्यांचा स्वतःचा विकास होण्यासाठी पोषक वातावरण उपलब्ध करून द्यावे.
4. पालकांनी पाल्याच्या आवडीचा विचार करावा.
5. विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करावा.

**संदर्भग्रंथ सुची :-**

1. मनीषा मुलाकलवार,(2018), तणाव प्रबंधन, शब्दयात्रा प्रकाशन
2. मुळे, उमाठे (१९८७), शैक्षणिक संशोधनाची मूलतत्वे, नागपूर, महाराष्ट्र विद्यापीठ, ग्रंथनिर्मिती मंडळ.
3. नीलिमा सप्रे, पाटील प्रीती, (2006) शिक्षणातील विचारप्रवाह, नित्य नूतन प्रकाशन, कोल्हापूर
4. शैलजा भंगाळे, (2017) शांततेसाठी शिक्षण, प्रशांत प्रकाशन, जळगाव
5. शैलजा भंगाळे, (2017) स्व आकलन, प्रशांत प्रकाशन, जळगाव